# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/11/2023 (शुक्रवार) दुपार

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध
## पोलीस स्टेशन वेलतूरची कारवाई

फिर्यादी पोलीस उपनिरीक्षक विलास गोमाजी करंगामी पोलीस स्टेशन वेलतुर हे आपल्या स्टाफसह दिनांक ०२/११/२०२३ चे ००.३० वा. ते ०२.३० वा. दरम्यान पो.शि. अमोल झाडे, पोशि. रोहीत आडे यांचेसह सरकारी वाहनाने पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असता मौजा आगरगांव गावा जवळील कन्हान नदीच्या पात्रात एक SOILS 4515 E Series कंपणीचा ट्रॅक्टर विना क्रमांकाचा मुडा व विश्वनाथ ट्रेडर्स वरठी कंपणीच्या ट्रॉलीमध्ये रेती भरीत आहे, अशी गोपनीय खबर मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस स्टेशन वेलतूर येथील स्टाफ यांनी नाकाबंदी केली असता चालक आरोपी नामे भगवान विठोबाजी वाडीभस्मे, रा. चापेगडी ता. कुही जिल्हा नागपुर हा अंधाराचा फायदा घेवुन ट्रॅक्टर जागीच सोडुन पळुन गेला. तेथे हजर असलेला इसम याला मालकाबाबत विचारणा केली असता त्याने मिच ट्रॅक्टरचा मालक असून नाव पांडुरंग सदाशिव मुंडले, वय ५० वर्ष, रा. चापेगडी ता. कुही जि. नागपुर असे सांगीतले. ट्रॅक्टरमध्ये रेती भरण्याकरीता तेथे हजर असलेले त्यांना नाव गांव विचारले असता त्यांनी आपले नाव **१) आशिष मिठु शेंडे वय २५ वर्ष, २) मोरेश्वर अभिमान राउत वय ३५ वर्ष, ३) गुड्डु रामकृष्ण देशपांडे, वय २१ वर्ष, ४) प्रविण रामचंद्र मांढरे वय २५ वर्ष सर्व रा. चापेगडी ता. कुही जि. नागपुर** असे सांगीतले व सर्व पांडुरंग सदाशिव मुंडले यांचे ट्रॅक्टरवर मजुरीने काम करीत असल्याचे सांगीतले ट्रॅक्टर मालक पांडुरंग सदाशिव मुंडले यास सदर रेतीचा परवाना बाबत विचारले असता रेती वाहतुकीचा परवाना नाही असे सांगीतले. विना परवाना SOILS 4515 E Series कंपणीचा ट्रॅक्टर विना क्रमांकाचा मुडा व विश्वनाथ ट्रेडर्स वरठी कंपणीच्या ट्रॉलीमध्ये नदीपात्रात रेती भरतांना मिळुन आल्याने ट्रॉलीमध्ये ०१ ब्रास रेती कन्हान नदी पात्रात भरतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून १) SOILS 4515 E Series कंपणीचा ट्रॅक्टर विना क्रमांकाचा किंमती अंदाजे ६,००,०००/—रू. व विश्वनाथ ट्रेडर्स वरठी कंपणीची ट्रॉली किंमती अंदाजे १,००,०००/—रू. २) विना क्रमांकाच्या ट्रॉलीमध्ये ०१ ब्रास रेती किंमती ५०००/—रू. ३) इतर साहीत्य किंमती अंदाजे ३५०/— रू. असा एकुण ७,०५,३५०/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि सहकलम ५०/१७७ मोवाका, ४८(७)(८) महसुल अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मंगेश काळे मो. नं. ९८२३०४२१५० करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत प्लाट नंबर ८९ जुना नंदनवन ले आउट हनुमान मंदीर जवळ नागपुर येथे दिनांक ०१/११/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०२/११/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— चंद्रशेखर हरीशचद्र बाळबुदधे, रा. प्लाट नंबर ८९ जुना नंदनवन ले आउट हनुमान मंदीर जवळ नागपुर यांचे नान्हा शेत शिवारात स्लॅपचे घर असुन शेताची देखरेख करणेकरीता ठेवलेला नोकर नामे — हरीभाउ वाडीभस्मे याने फोन करून सांगीतले की, शेतातील घरातुन व आवारातुन १) ३० कीलो चने भरलेले ५ पोते एकुण किंमती १३५००/—रू. २) दोन लोखंडी ड्रम किंमती १०००/—रू. ३) प्लास्टिकच्या ५ खुर्च्या किंमती १५००/—रू. ४) खाचराला लागलेले दोन लोखंडी चाके किंमती ४०००/—रू ५) एच पी कंपनीचा गॅस सिलेंडर व सेगडी किंमती ३०००/—रू ६) लोखंडी ॲंगल १० नग किंमती ३०००/—रू ७) वॉल कंपाउन्ड ताराचा बंडल किंमती १०००/—रू असा एकुण २६८००/—रू चा मुद्देमाल कोणत्यातरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. चांदेवार मो. नं. ९७६५२२११६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**